RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष ९, अंक ७९(२)] शुक्रवार, जून ९, २०२३/ज्येष्ठ १९, शके १९४५ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २२६

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ जून, २०२३.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक मुविनि-२०२३/प्र.क्र.४४/ऊर्जा-१.— महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (२०१५ चा महा.अधि.३१) दिनांक २१ ऑगस्ट २०१५ च्या कलम ३(१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मुख्य विद्युत निरीक्षक यांच्या कार्यालयामार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, त्याकरिता नियत कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय अपील प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

**परिशिष्ट**

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपील प्राधिकारी | व्दितीय अपील प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १. | तारतंत्री परीक्षेतून सूट मिळालेल्या व्यक्तीला तारतंत्री प्रमाणपत्र देणे | पंधरा दिवस | संबंधित निरीक्षण विभागाचे विद्युत निरीक्षक | संबंधित प्रादेशिक विद्युत मंडळाचे अधिक्षक अभियंता | मुख्य विद्युत निरीक्षक |
| २. | पर्यवेक्षकाच्या परीक्षेतून सूट मिळालेल्या व्यक्तीला विद्युत पर्यवेक्षक क्षमता प्रमाणपत्र देणे | पंधरा दिवस | संबंधित निरीक्षण विभागाचे विद्युत निरीक्षक | संबंधित प्रादेशिक विद्युत मंडळाचे अधिक्षक अभियंता | मुख्य विद्युत निरीक्षक |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| ३. | (अ) जेथे मालक आणि पर्यवेक्षक दोघेही समान व्यक्ती आहेत त्यांना विद्युत ठेकेदार परवाना जारी करणे | तीस दिवस | संबंधित निरीक्षण विभागाचे विद्युत निरीक्षक | संबंधित प्रादेशिक विद्युत मंडळाचे अधिक्षक अभियंता | मुख्य विद्युत निरीक्षक |
| | (ब) जेथे मालक आणि पर्यवेक्षक भिन्न व्यक्ती आहेत त्यांना विद्युत ठेकेदार परवाना जारी करणे | तीस दिवस | सचिव अनुज्ञापक मंडळ आणि मुख्य विद्युत निरीक्षक | उप सचिव (ऊर्जा) | प्रधान सचिव (ऊर्जा) |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. श्री. कराड,**
शासनाचे उप सचिव.